दहशतवादाविरोधात कारवाई सुरुच राहणार!

संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी पाकिस्तानला सुनावले

शांघाय । वृत्तसंस्था

चीनमध्ये शांघाय सहकार्य परिषदेसाठी भारताचे संरक्षण मंत्री राजनाथ सिंह गेले आहेत. या परिषदेच्या निमित्ताने पाकिस्तानचे संरक्षण मंत्री ख्वाजा आसिफही चीनमध्ये आले आहेत. ऑपरेशन सिंदूर नंतर भारत आणि पाकिस्तान दरम्यान झालेल्या तणावानंतर दोन्ही नेते प्रथमच समोरासमोर आले. शंघाई परिषदेत संरक्षणमंत्र्यांची बैठक सुरु झाल्यानंतर राजनाथ सिंह यांनी पाकिस्तानला फटकारत खडे बोल सुनावले. पाकिस्तान पुरस्कृत दहशतवाद आणि ऑपरेशन सिंदूरचा उल्लेख करत राजनाथ सिंह यांनी ख्वाजा आसिफ यांना सुनावले.

एससीओ संरक्षण मंत्र्यांच्या बैठकीत पाकिस्तानीचे संरक्षण मंत्री ख्वाजा आसिफसमोर राजनाथ सिंह यांनी दहशतवाद आणि ऑपरेशन सिंदूरचा उल्लेख केला. ते म्हणाले, आम्ही दहशतवादाविरुद्ध कारवाई करत राहू. शांतता, समृद्धी आणि दहशतवाद एकत्र येऊ शकत नाहीत. या आव्हानांना तोंड देण्यासाठी निर्णायक कृतीची आवश्यकता आहे. आमच्या सुरक्षिततेसाठी आम्ही या गोष्टींविरुद्ध लढत राहू.

एकमेकांचा विश्वास महत्त्वाचा

पहलगाम दहशतवादी हल्ल्याचा संदर्भ देत संरक्षण मंत्री राजनाथ सिंह म्हणाले, २२ एप्रिल २०२५ रोजी, द रेझिस्टन्स फ्रंट या दहशतवादी संघटनेने जम्मू आणि काश्मीरमधील पहलगाममध्ये निष्पाप पर्यटकांवर क्रूर हल्ला केला. यामध्ये २६ निष्पाप नागरिकांचा मृत्यू झाला. धार्मिक ओळखीच्या आधारे पर्यटकांना गोळ्या घालण्यात आल्या. संयुक्त राष्ट्रांने बंदी घातलेल्या दहशतवादी गट लष्कर-ए-तैयबाचा प्रॉक्सी असलेल्या रेझिस्टन्स फ्रंटने या हल्ल्याची जबाबदारी स्वीकारली आहे. राजनाथ सिंह म्हणाले, कोणताही देश, कितीही मोठा आणि शक्तिशाली असला तरी, एकटा कारवाई करू शकत नाही. यामुळे जागतिक व्यवस्थेत एकमेकांचा विश्वास आणि सहकार्य यावर भर दिला पाहिजे. सर्वे जन सुखिनो भवन्तु ही भारताची जुनी म्हण आहे. त्यानुसार शांतता आणि समृद्धी याला भारत महत्व देते.

संत ज्ञानेश्वर माऊलींच्या पादुकांचे नीरा स्नान

पुणे । प्रतिनिधी

संत ज्ञानेश्वर माऊलींच्या आषाढी वारी मधील शाहीस्नान सोहळा आज नीरा नदीमध्ये पार पडला आहे. पुरंदर तालुक्यातील नीरा नदीच्या काठावर आज हा सोहळा दुपारच्या विसाव्यासाठी थांबला होता. विश्रांती नंतर हा सोहळा दुपारी एक वाजता निरा स्नानासाठी मार्गस्थ झाला. नीरा नदीवर असलेल्या जुन्या ब्रिटिशकालीन पुलावरून माऊलींचा हा लवाजमा स्नानासाठी चालला होता. पुलावरील ते विहंगमय दृश्य पाहण्यासाठी या ठिकाणी वारकरी आणि माऊली भक्तांची मोठी गर्दी जमा झाली होती. हे दृष्य डोळ्यात साठवणे हे एक पर्वणीच मानली जाते.

माऊलींच्या पादुका रथातून बाहेर काढण्यात आल्या. त्यानंतर त्या नीरा नदीवरील दत्त घाटावर आणण्यात आल्या. ज्या वेळी या पादुका घाटावर घेवून जाण्यात येत होत्या त्यावेळी माऊली माऊली असा एकच जयघोष सुरू झाला. मंगलमय भक्तीमय वातावरणात संत ज्ञानेश्वर माऊलींच्या पादुकांना नीरा नदीमध्ये स्नान घालण्यात आले. यावेळी नदी काठी आणी घाटावर भाविकांची तुडुंब गर्दी जमली होती. हा क्षण प्रत्येकाला आपल्या डोळ्यात साठवायचा होता. होणारी गर्दी ही प्रशासनाला आपेक्षित होती. शिवाय नीरा नदीत मोठ्या प्रमाणात पाणी होते. या भागात पाऊस झाल्या मुळे नीरा नदी दुथडी वाहात होती. त्यामुळे प्रशासनाकडून योग्य ती खबरदारी देखील घेण्यात आली होती. यानंतर माऊलींना तुळशीहार अर्पण करण्यात आला. त्यानंतर हा सोहळा हैबतबाबाचे जन्मस्थळ असलेला सातारा जिल्ह्याकडे मार्गस्थ झाला. संत ज्ञानेश्वर माऊलींचा आजचा सोहळा हा लोणंद मध्ये मुक्कामी असणार आहे.

संसद नव्हे तर संविधानच सर्वोच्च

रचना बदलण्याचा अधिकार नाही-सरन्यायाधीश

अमरावती । वृत्तसंस्था

देशातील तीन प्रमुख स्तंभ - कार्यपालिका, विधीमंडळ आणि न्यायपालिका - हे सर्व संविधानाच्या चौकटीत कार्यरत असतात. संसद सर्वोच्च आहे, असे अनेकजण मानतात, मात्र प्रत्यक्षात सर्वोच्च असते ते संविधान असे परखड मत सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश डॉ. बी. आर. गवई यांनी व्यक्त केले आहे. सुप्रीम कोर्टाचे ५२ वे सरन्यायाधीश म्हणून शपथ घेतलेले न्यायमूर्ती गवई आपल्या मूळगावी अमरावती येथे आयोजित सत्कार समारंभात बोलत होते. अमरावती येथील वकिल संघाच्यावतीने त्यांचा सत्कार झाला.

मूलभूत रचनेचे संरक्षण सर्वोच्च न्यायालयाचे कर्तव्य सरन्यायाधीश गवई यांनी केसवानंद भारती वि. केरळ राज्य या १९७३ मधील ऐतिहासिक खटल्याचा संदर्भ देताना सांगितले की, या निर्णयात सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले की संविधानाची मूलभूत रचना बदलता येणार नाही. या निर्णयाने अस्तित्वात आली. आपल्याकडे केवळ अधिकार नाही, तर संविधानाने दिलेली जबाबदारी आहे. फक्त सरकारविरोधात निर्णय देणे म्हणजे स्वायत्तता नाही, असे ते म्हणाले. सरन्यायाधीश गवई म्हणाले की, संसदेकडे संविधानात दुरुस्ती करण्याचा अधिकार आहे, मात्र ती संविधानाच्या मूलभूत रचनेत बदल करू शकत नाही. संसदेचा अधिकार फक्त दुरुस्त्या करण्यापुरता आहे, संविधानाची मूलभूत रचना बदलण्याचा अधिकार नाही, असे ते म्हणाले.

लोक काय म्हणतील या विचाराने निर्णयप्रक्रिया प्रभावित होऊ नये न्यायाधीशांनी स्वतंत्रपणे विचार करणे आवश्यक आहे आणि लोक काय म्हणतील याचा विचार करून निर्णय घेणे हे न्यायनिवाड्याच्या तत्त्वाला हरताळ फासणारे ठरते, असे सरन्यायाधीश गवई यांनी स्पष्ट केले.

शुभांशू शुक्ला आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकात पोहोचले

फ्लोरिडा । वृत्तसंस्था

भारतीय अंतराळवीर शुभांशू शुक्ला यांच्यासह चारही अंतराळवीर सुमारे २८ तासांच्या प्रवासानंतर २६ जून रोजी दुपारी ४:०० वाजता आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावर पोहोचले. पूर्वी त्यांचा आगमन वेळ ४:३० वाजता होता. म्हणजेच हे अंतराळवीर वेळेच्या ३० मिनिटे आधी अंतराळ स्थानकावर पोहोचले आहेत. त्याआधी, मिशन क्रूने अंतराळयानातून लाईव्ह संभाषण केले. यामध्ये शुभांशूने म्हटले होते- अंतराळातून नमस्कार! माझ्या सहकारी अंतराळवीरांसोबत येथे येऊन मी खूप उत्साहित आहे. ते म्हणाले, जेव्हा आम्हाला व्हॅक्यूममध्ये सोडण्यात आले, तेव्हा मला फारसे बरे वाटत नव्हते. मी खूप झोपलो. मी इथे लहान मुलासारखा शिकत आहे. ॲक्सियम मिशन ४ अंतर्गत, सर्व अंतराळवीर २५ जून रोजी दुपारी १२ वाजता आयएसएसकडे रवाना झाले.

राज्य विधिमंडळाचे अधिवेशन तीन आठवडे

संसदीय कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीत निर्णय

मुंबई । प्रतिनिधी

येत्या ३० जूनपासून सुरु होणारे राज्य विधिमंडळाचे पावसाळी अधिवेशन तीन आठवडे चालणार आहे. विधानभवनात गुरुवारी झालेल्या संसदीय कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीत विधानसभा आणि विधान परिषदेचे १८ जुलैपर्यंतचे कामकाज निश्चित करण्यात आले. या विधेयकातील तरतुदींमुळे वादग्रस्त ठरलेले जनसुरक्षा विधेयक याच अधिवेशनात मांडण्यात येणार आहे.

विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे, विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, संसदीय कामकाज मंत्री चंद्रकांत पाटील, अन्न आणि नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे विधिमंडळ नेते भास्कर जाधव, काँग्रेसचे नितीन राऊत, विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांच्या उपस्थितीत विधानसभा आणि विधान परिषदेचे कामकाज निश्चित करण्यासाठी स्वतंत्र बैठका झाल्या. या बैठकीत झालेल्या निर्णयानुसार अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी दोन्ही सभागृहात सन २०२५-२६ या वर्षाच्या पुरवणी मागण्या सादर केल्या जाणार आहेत. या पुरवणी मागण्यांवर त्यानंतरच्या पुढील आठवड्यात म्हणजे ७ आणि ८ जुलै रोजी चर्चा होऊन त्या मंजूर केल्या जातील. याच अधिवेशनात जनसुरक्षा विधेयक सादर करण्यात येणार आहे. दरम्यान, राष्ट्र विघातक डाव्या कडव्या विचारांनी तरुणाई प्रभावित होऊन ती नक्षलवादाकडे वळण्याचा धोका रोखण्यासाठी आणि देशाच्या संविधानाला झुगारणाऱ्या घातक नक्षल विचारांना पायबंद बसावा म्हणून महाराष्ट्र सरकारचे विशेष जनसुरक्षा विधेयक हे एक महत्वाचे पाऊल ठरणार असल्याचे मत विशेष जनसुरक्षा विधेयक समितीचे अध्यक्ष तथा महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी व्यक्त केले. या विधेयकासंदर्भात अंतिम विचार विनिमय करण्यासाठी विधानभवनात समितीची पाचवी बैठक गुरुवारी विधानभवनात झाली. त्यानंतर पत्रकारांशी बोलताना बावनकुळे म्हणाले, महाराष्ट्रातील सुजाण नागरिकांनी या विधेयकाच्या बाजूने प्रचंड संख्येने आपले सकारात्मक मत व्यक्त केले असून, तब्बल १३ हजार सूचना, सुधारणांचा समावेश, उद्दिष्ट्य आणि उद्देशांवर अभ्यास करून विधेयक तयार झाले आहे. काही विशिष्ट प्रवृत्तींमध्ये नक्षलवादी संघटनांकडे आकर्षित होण्याचा कल दिवसेंदिवस वाढत असल्याचे दिसून येते. यावर परिणामकारकरित्या प्रतिबंध घालण्यासाठी आणि विशेषतः या चळवळीकडे आकर्षिक होऊ पाहणाऱ्या तरुणांना यापासून परावृत्त करुन समाजाच्या मुख्य प्रवाहात सामील करण्यासाठी शासनाने सर्वंकक्ष धोरण तयार करावे, अशी शिफारसही समितीने सरकारकडे केली आहे. कडव्या डाव्या विचारसरणीच्या संघटनांच्या किंवा यासारख्या संघटनांच्या विवक्षित बेकायदेशीर कृत्यांचा प्रभावीपणे प्रतिबंध करण्यासाठी आणि तत्संबंधित किंवा तदानुषंगिक बाबींकरीता तरतूद करण्यासाठी नवीन कायदा अधिनियमित करणे इष्ट आहे.

पारोळा तालुक्यातील सुमठाणे येथे महिलेचा खून

बलात्कार झाल्याची शक्यता; ओळख पटविण्याचे पोलिसांचे आवाहन

पारोळा । प्रतिनिधी

तालुक्यातील सुमठाणे शिवारातील जंगलात एका ३५ ते ४० वर्षीय महिलेचा मृतदेह आढळून आल्याने तालुक्यात एकच खळबळ माजली आहे या महिलेच्या डोक्यावर वार केले असून तिचा खून करण्यात आल्याची घटना दि.२६ रोजी पहाटे उघडकीस आली. याबाबत दि.२६ रोजी रात्री १२.३० वाजेच्या पूर्वी सुमठाणे (ता.पारोळा) शिवारात जंगलामध्ये अनोळखी महिला नावगाव माहीत नाही वय अंदाजे ३५ ते ४० वर्ष असलेली महिला हिस कोणीतरी अज्ञात व्यक्तीने अज्ञात कारणावरुन तिला कोणत्यातरी हत्याऱ्याने तिचे कपाळावर, डोक्यावर, तोंडावर दुखापती करुन अगर गळा आवळुन जिवे ठार मारुन पुरावा नष्ट करण्याच्या उद्देशाने तिचा चेहरा प्लॉस्टीकच्या गोणीने झाकुन झाडा-झुडपामध्ये लपवून तिला ठार मारले आहे. रात्री घटनास्थळी स.पो.नि.योगेश महाजन, पो.उप.नि.अमरसिंग वसावे, पो.हे.सुनील हटकर, पो.काँ.अभिजीत पाटील, म.पो.काँ.सविता पाटील, वालजी पोपट पाटील, पोलीस पाटील सुमठाणे यांनी जाऊन तपासणी केली. महिलेचे वय अंदाजे ३५ ते ४० वर्ष असुन सदर महिलेचे कपाळावर व डोक्यावर मारहाणीच्या जखमांच्या निशण्या आहेत. अनोळखी महिला मिळुन आल्याने सदर महिलेची ओळख पटविण्याचा प्रयत्न केला असता तिची ओळख पटू शकलेली नाही. अज्ञात महिलेचा मृतदेह रुग्णवाहिकाचालक सागर मराठे व दीपक पाटील यांनी रुग्णवाहिकेतून पारोळा कुटीर रुग्णालयात दाखल केला होता त्यानंतर जळगाव येथे फॉरेन्सिक लॅबला पाठवण्यात आले. याबाबत सरकारतर्फे पोलीस नायक संदिप अशोक सातपुते यांनी पारोळा पोलीस ठाण्यात फिर्याद दिल्यावरून अज्ञात इसमाविरुध्द खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक योगेश महाजन हे करीत आहेत.

पंत, गिलसाठी चिअर करणारी मिस्ट्री गर्ल आहे तरी कोण?

लीड्स । वृत्तसंस्था

लीड्समध्ये खेळल्या गेलेल्या पहिल्या कसोटी सामन्यात भारतीय क्रिकेट संघाला इंग्लंडविरुद्ध ५ विकेटने पराभव पत्करावा लागला. यासोबतच, ५ सामन्यांच्या मालिकेत टीम इंडिया ०-१ ने पिछाडीवर आहे. मात्र, या काळात टीम इंडियाच्या ड्रेसिंग रूममध्ये एक मिस्ट्री गर्ल दिसली. लोक या मिस्ट्री गर्लमध्ये खूप रस दाखवत आहेत.

मिस्ट्री गर्ल कोण आहे?

ही मिस्ट्री गर्ल शुभमन गिल आणि ऋषभ पंत यांना चिअर्स करताना दिसली. सोशल मीडियावर लोक तिच्याबद्दल जाणून घेण्यास उत्सुक आहेत. अद्याप तिची ओळख पटलेली नाही. असे मानले जाते की ती टीम इंडियाच्या स्टाफशी संबंधित आहे. भारत आणि इंग्लंड यांच्यातील अँडरसन-तेंडुलकर ट्रॉफीचा पहिला सामना लीड्समध्ये सुरू होता. सामन्याच्या पहिल्या दिवशी, जेव्हा भारतीय डाव संपला, तेव्हा एक तरुणी टीम इंडियाच्या ड्रेसिंग रूममध्ये दिसली. ऋषभ पंत आणि शुभमन गिल पॅव्हेलियनमध्ये परतल्यानंतर ती टीम इंडियाला चिअर करत होती.

विधीलिखित

सुरेशराव बोरकर, ब्रह्मांड ज्योतिष कार्यालय, रावेर. मो. : ९८५००१५५५८

शुक्रवार, दि.२७ जून २०२५

--* दैनंदिन राशिभविष्य *-*-*

मेष - खरेदीचे योग भरपूर आहेत.
वृषभ - उत्साहाची कमरता भासेल.
मिथुन - सर्व प्रवास सुखकर होतील.
कर्क - बुद्धीचा विकास बघावयास मिळेल.
सिंह - खूप मेहनतीचा आजचा दिवस असेल.
कन्या - घरात शांतता टिकविण्याचा प्रयत्न करा.
तूळ - कायद्याचे प्रश्न किचकट होतील.
वृश्चिक - बुद्धीचे कौतुक केले जाईल.
धनू - पती आरोग्याकडे लक्ष द्यावे लागेल.
मकर - वाहन शक्यतोवर चालवू नका.
कुंभ - लेखी व्यवहारात फसगत होईल.
मीन - बुद्धी चातुर्याचा खेळ खेळाल.

हातातच दोष...यशस्वी झेल घेण्यास का ठरला अयशस्वी?

लीड्स । वृत्तसंस्था

भारत आणि इंग्लंड यांच्यात हेडिंग्ले येथे खेळल्या गेलेल्या पहिल्या कसोटी सामन्यात युवा खेळाडू यशस्वी जयस्वालने चार झेल सोडले. हे भारतासाठी खूप महागडे ठरले. यामुळे भारताने पाच सामन्यांच्या मालिकेतील पहिला सामना गमावला असे अनेकांचे मत आहे. यशस्वीने पहिल्या डावात शानदार शतक झळकावले, परंतु त्याचे चुकलेले झेल चर्चेचा विषय बनले. या सामन्यात भारताला पाच विकेट्सनी पराभव स्वीकारावा लागला. आता यशस्वीकडून एक नाही तर चार झेल कसे सुटले यामागचे कारण समोर आले आहे.

जयस्वाल इतके झेल का चुकवत आहेत?

मोहम्मद कैफने सांगितले की, यशस्वीला त्याच्या हातावर लावलेल्या पट्ट्याचा त्रास होत होता. पट्ट्यामुळे बोटे योग्यरित्या वाकू शकत नाहीत. त्यामुळे झेल पकडण्यात अडचण येते. कैफने त्याच्या यूट्यूब चॅनेलवर हे सांगितले. कैफने सांगितले की पट्टा लावल्याने बोटे एकाच ठिकाणी चिकटतात. यामुळे बोटे फिरवण्यास त्रास होतो त्यामुळे चेंडू पकडणे कठीण होते. चेंडू आणि हाताचा थेट संपर्क होत नाही. कैफ म्हणाला, यशस्वी जयस्वाल झेल का सोडत आहे? आम्ही ड्यूक बॉलने सराव करत आहोत. जेव्हा आम्हाला दुखापत होते तेव्हा आम्ही स्ट्रॅप लावतो. अशा परिस्थितीत बोटे चिकटतात आणि हालचाल करू शकत नाहीत. तुम्ही झेल पकडू शकत नाही कारण स्ट्रॅप स्पंज बनतो. चेंडू त्यावरून उडी मारतो, म्हणून तो हानिकारक आहे. चेंडूशी नैसर्गिक संपर्क गमावू नये. हातातच दोष होता कारण पट्ट्या बांधल्या होत्या.

जडेजानेही झेल सोडला

फक्त यशस्वीच नाही, रवींद्र जडेजानेही एक सोपा झेल सोडला. जडेजा हा जगातील सर्वोत्तम क्षेत्ररक्षकांपैकी एक मानला जातो. ऋषभ पंत आणि जसप्रीत बुमराह यांनीही इंग्लंडच्या फलंदाजांना जीवदान दिले. इंग्लंडला याचा फायदा झाला आणि त्यांनी ऐतिहासिक विजय मिळवला. आता भारतासाठी समस्या अशी आहे की त्यांचा स्टार वेगवान गोलंदाज बुमराह उर्वरित चार सामन्यांपैकी दोन सामने खेळणार नाही. पहिल्या सामन्यात फक्त बुमराह लयीत दिसला. मोहम्मद सिराज आणि प्रसिद्ध कृष्णा यांना लय शोधण्यासाठी संघर्ष करावा लागला. संघ व्यवस्थापनाला खालच्या फळीतील फलंदाजीवरही लक्ष केंद्रित करावे लागेल.

देशदूत
हे दैनिक मुद्रक व प्रकाशक **राजेंद्र कृष्णराव सोनवणे** यांनी श्रीरंग प्रकाशन प्रा.लि.यांच्याकरिता सकाळ मीडिया प्रा.लि., प्लॉट नं.सी-३, एम.आय.डी.सी.एरिया टेलिफोन एक्सचेंजसमोर, औरंगाबाद रोड, जळगाव-४२५००३ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करुन देशदूत कार्यालय, अमर चित्र मंदिर चौक, नंदुरबार-४२५४१२ येथे प्रसिध्द केले. ● **व्यवस्थापकीय संपादक : विक्रम सारडा.** ● **संपादक : हेमंत दिनेश अलोने*. फोन नं.**: नंदुरबार-२२११०१, जळगाव शहर कार्यालय-२२२८७८१, २२२४६६०, भुसावळ-२२०६८०, २२४७९५, रावेर-२५०४४४, धुळे-२३७९१४, फॅक्स-२३८९१४. **RNI.No. 69123/1998.** (* पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे.)